advt17

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

## आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

## १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

# कृषी विद्यापीठातील पदवी प्रवेश २०१७-१८

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता खालील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

सर्व अभ्यासक्रमांचे माध्यम इंग्रजी भाषा राहील.

**उपलब्ध अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता-**

१. किमान वयः- प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत उमेदवाराचे वय किमान १६ वर्षे असावे.

२. एकूण गुणः- पात्रता परीक्षेमध्ये (इ. १२ वी ) खुल्या उमेदवारास ५० टक्क्यांपेक्षा कमी आणि आरक्षित प्रवर्गाच्या (अ.जा. / अ.ज. / वि.जा. / भ.ज. (ब) / भ.ज. (क) / भ.ज. (ड) / इमाव / विमाव ) उमेदवारास ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण नसावे.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>पदवी अभ्यासक्रम</th><th>प्रवेश पात्रता</th></tr>
<tr><td>१.</td><td>बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी)</td><td rowspan="2">महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.जी. किंवा भौ.र.ग.जी. किंवा भौ.र.ग. किंवा इंटर (कृषी) आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>जीवशास्त्र, गणित हे विषय घेतले नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील.</td></tr>
<tr><td>२.</td><td>बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या)</td></tr>
<tr><td>३.</td><td>बी.एफ्.एस्सी.</td><td rowspan="3">महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.जी. किंवा भौ.र.ग.जी. किंवा इंटर (कृषी) आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>गणित हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील.</td></tr>
<tr><td>४.</td><td>बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या)</td></tr>
<tr><td>५.</td><td>बी. एस्सी. (पशुसंवर्धन)</td></tr>
<tr><td>६.</td><td>बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी)</td><td rowspan="2">महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.ग किंवा भौ.र.ग.जी. आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>जीवशास्त्र हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील.</td></tr>
<tr><td>७.</td><td>बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान)</td></tr>
<tr><td>८.</td><td>बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान)</td><td>महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.ग. किंवा भौ.र.ग.जी. किंवा भौ.र.जी.</td></tr>
</table>

| अ. क्र. | पदवी अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता |
|---|---|---|
| ९. | बी. टेक. (जैव तंत्रज्ञान) | आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>जीवशास्त्र, गणित हे विषय घेतले नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील. |
| १०. | बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.ग. किंवा भौ.र.ग.जी. किंवा भौ.र.जी.* किंवा इंटर (कृषी) आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>*गणित हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील. |

**(भौ.- भौतिकशास्त्र र.- रसायनशास्त्र ग.- गणित जी.- जीवशास्त्र)**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा 'ऑनलाईन पध्दती'ने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** **व** **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर दि. १५ जून,२०१७ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुकांनी '**maha-agriadmission.in**' या संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. १० जुलै,२०१७ पर्यंत** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. १०००/-
आरक्षित प्रवर्गासाठी रु. ५००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)
[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य. ]

क्र. मकृप/शिक्षण-१/१९१७/१३६९
दिनांक- ७ जून,२०१७

**स्वाक्षरीत/-**
**महासंचालक,**
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे